# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०७.०६.२०२६ रविवार**

**नागपूर पोलीस आयुक्तालय तर्फे आयोजीत "SUNDAY ON CYCLE " कार्यक्रम संपन्न :—**

मा. पंतप्रधान, भारत सरकार यांनी फिट इंडीया संकल्पना सुरू केलेली असुन, त्या अनुषंगााने ०३ जुन रोजी जागतीक सायकल दिवस साजरा करण्यात येतो. दिनांक ०१ जुन २०२६ ते दि. १४ जुन २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रम सायकलींग, योग, झुंबा डान्स, दोरीवरील उड्या इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. त्या अंतर्गत आज दिनांक ०७.०६.२०२६ रोजी ०६.३० वा. मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सहपोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत पोलीस जिमखाना, वॉकर्स रोड, सिव्हील लाईन, नागपुर येथुन "**SUNDAY ON CYCLE**" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मा. सह पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी "**SUNDAY ON CYCLE**" रॅलीला हिरवी झेंडी दाखवुन 'सायकल रॅली' सुरूवात केली. सायकल रॅली ही पोलीस जिमखाना येथुन सुरू होवुन, रामगिरी बंगला टि पॉईंट—सायकल चौक—तेलंगखेडी मंदीर—फुटाळा वाय पॉईंट व तेथुन तेलंगखेडी मंदीर—सायकल चौक—डब्ल्युसिएल रोड—रामगिरी व पोलीस जिमखाना अशा मार्गाने जावुन संपन्न झाली. सायकल रॅली एकुण ०७ कि.मी. अंतराची होती. सायकल रॅली मध्ये मा. सह पोलीस आयुक्तांसह मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, श्री. वसंत परदेशी, श्रीमती विनीता शाहु, मा. पोलीस उपायुक्त श्री. आदीत्य मिरखेलकर, श्रीमती अन्नपुर्णा सिंग, श्री. शशिकांत सातव यांसह सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच, लहान मुले—मुली, तरूण—तरूणी, विद्यार्थी—विद्यार्थींनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन आपला उत्साह दाखविला.






**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०६.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १९ केसेसमध्ये १९ ईसमांवर कारवाई करून ३५,२८०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये १५ ईसमांवर कारवाई करून १,०९,०७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९४८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२३,४५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**<u>२) गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :— चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ३०.०५.२०२६ चे १८.०० वा. ते ०२.०६.२०२६ चे १७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीत इंदीरानगर झोपडपट्टी, शुक्रवारी तलावजवळ, गणेशपेठ येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती सुभद्रा किशोर मस्ते वय ६० वर्षे यांनी त्यांचे राहते घरी आलमारीमध्ये रोख १३,०००/— रु. तसेच सोन्याची चैन, अंगठी व कानातले असा एकूण १,९३,०००/— रु. चा मुद्येमाल ठेवलेला होता. तो दिसून आला नाही. कोणीतरी चोरुन नेला. याप्रकरणी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्हयाचे तपासात गणेशपेठ पोलीसांनी चौकशी केली असता, दिनांक २९.०५.२६ रोजी दुपारी फिर्यादी यांचा नातू नामे तुषार प्रदीप मस्ते वय २२ वर्ष रा. इंदीरानगर झोपडप्टी, नागपूर हा फिर्यादीचे घरी आला होता असे समजल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याची सखोल विचारपूस केली असता, त्याने नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी याने त्याचे मैत्रिणीवर खर्च करण्याकरीता चोरी केल्याचे सांगितले. आरोपी याने सोन्याचे दागिने विकलेल्या सोनाराकडून जप्त करण्यात आले आहे. आरोपीस गुन्हयात अटक करुन त्याचे ताब्यातून गुन्हयातील संपुर्ण मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनिता साहू, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, श्री राहुल मदने, पोउपआख परि.क्र. ३, श्रीमती अनिता मोरे, सपोआ, कोतवाली विभाग, वपोनि अतुल तवाडे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजय नाचण, पोहवा समिर शेख, पोअं. पवन मालखेडे, वैभव यादव, प्रतिक इटनकर यांनी केली आहे.




**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. ०१, जयहिंद नगर, टेकऑफ सिटी रोड, गोन्हीसिम, नागपुर येथे राहणारे फिर्यादी मेघराज नारायण रोडगे वय ५० वर्षे हे काटोल येथे नोकरीवर व त्यांची पत्नी वर्धा येथे शिक्षिका असून ते दोघे शनिवार व रविवारी नागपूर येथे राहते घरी येतात. फिर्यादी यांनी घरी लावलेल्या सीसीटिव्हीचा ॲक्सेस त्यांचे मोबाईलवर आहे. दिनांक ०६.०६.२०२६ चे ०१.०० वा. ते ०२.०० वा. चे

दरम्यान, फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर कोणीतरी अज्ञात इसम फिर्यादीचे घराचे गेटचे कुलूप तोडून आंत प्रवेश करून, सीसीटिव्ही फोडतांना दिसला. फिर्यादी यांनी सकाळी घरी येऊन पाहणी केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आत प्रवेश करुन, आलमारीतील रोख २,०००/–रू. तसेच, सोन्याचा सिक्का तसेच कंपाऊंड मध्ये ठेवलेली हुंडई आय–२० कार क्र. एमएच ४९ व्हीक्यु २२७९ असा एकुण किंमती ५,८१,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. हनुमंत नखाते ९६३७२४१८९८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**<u>गुन्हे शाखा पोलीसांची दि. ०६/०६/२०२६ रोजी एकत्रित कामगिरी</u> :–**

मा. श्री डॉ. रविंद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, श्री मा. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त(डिटेक्शन), श्री अभिजीत पाटील, सपोआ, गुन्हे, नागपूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा अंतर्गत विविध युनिट/पथक यांनी दि. ०६/०६/२०२६ रोजी शहरातील विविध पोलीस ठाणे हद्दीत विशेष मोहिम राबवून अवैध दारू विक्री, वाहन चोरी, मोबाईल चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, मादक/अंमली पदार्थ सेवन तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई केली. गुन्ह्यातील सर्व आरोपी, जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आली.

**प्रमुख कारवाईचा तपशील**

**१) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत कारवाई**

गिट्टीखदान, नंदनवन, जरीपटका, सोनेगाव, भांडेवाडी व पाचपावली पोलीस ठाणे हद्दीत एकूण ०६ कारवाई करण्यात आल्या. या कारवाईमध्ये ०६ आरोपींविरुद्ध कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले.

**जप्त मुद्देमाल**

| | | |
|---|---|---|
| हातभट्टी मोहफुलाची गावठी दारू | – | ४२ लिटर |
| देशी दारूच्या विविध बाटल्या | – | १२७ नग |
| दारू विक्रीची रोख रक्कम | – | ४७० /– |
| एकूण जप्त मुद्देमाल किंमत अंदाजे | – | १९,५८०/– |

**२) वाहन चोरी व मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस**

गुन्हे शाखा युनिट क्र. ०५, युनिट क्र. ०३ व वाहन चोरी विरोधी पथक यांनी स्वतंत्र कारवाईत वाहन चोरी व मोबाईल चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस आणले.

**आरोपी ताब्यात :–** ०५ आरोपी व ०१ विधी संघर्षग्रस्त बालक

**जप्त मुद्देमाल :—** दुचाकी वाहने — ०५, मोबाईल फोन — ०६
एकूण किंमत अंदाजे —३,३९,१००/—

**३) भारतीय हत्यार कायदा अंतर्गत कारवाई**
युनिट क्र. ०२ व युनिट क्र. ०३ यांनी सीताबर्डी व कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत स्वतंत्र कारवाया करून ०२ आरोपींविरुद्ध कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये कारवाई केली.
**जप्त मुद्देमाल :—** धारदार चाकू — ०१, प्राणघातक शस्त्र — ०१

**४) NDPS Act अंतर्गत कारवाई**
युनिट क्र. ०२ यांनी सीताबर्डी पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०१ आरोपीविरुद्ध कलम २७ NDPS Act अंतर्गत कारवाई केली.
**जप्त मुद्देमाल :** गांजा सेवनासाठी वापरलेली चिलम, माचिस व साहित्य किंमत अंदाजे ५१/—

**५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत कारवाई**
युनिट क्र. ०४ यांनी सक्करदरा पोलीस ठाणे हद्दीत घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर व नियमबाह्य साठवणूक करणाऱ्या ०१ आरोपीविरुद्ध कलम २८७ भा.न्या.सं. सह कलम ३, ७ अत्यावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत कारवाई केली.
**जप्त मुाद्देमल :** घरगुती HP गॅस सिलेंडर— ०७, व्यावसायिक HP गॅस सिलेंडर — ०८
व्यावसायिक शेगड्या — ०२, मोबाईल फोन— ०१, इतर साहित्य एकूण किंमत —८५,५००/—

एकत्रित कामगिरी : (दि. ०६/०६/२०२६)

| **कारवाईचा प्रकार** | | **संख्या** |
|---|---|---|
| महाराष्ट्र दारूबंदी कायदा कारवाया | — | ०६ |
| वाहन/मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस | — | ०३ |
| भारतीय हत्यार कायदा कारवाया | — | ०२ |
| NDPS Act कारवाई | — | ०१ |
| अत्यावश्यक वस्तू अधिनियम कारवाई | — | ०१ |
| **एकूण कारवाया** | **—** | **१३** |
| **एकूण आरोपी ताब्यात** | **—** | **१५** |
| एकुण तक्रारी अर्ज निर्गती | — | ७९ |
| एकुण आरोपी चेकिंग<br>(शरिराविरूध्द/मालमत्ते विरूध्द) | — | ३४ |